महाराष्ट्र शासन
**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in
**Website**: www.jdroamt.org
**Fax No**: (0721) 2577913

**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादीत**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२५/ 3169
दिनांक :- 25 NOV 2025

**प्रति,**

**प्राचार्य / संचालक,**
सर्व शासकीय / खाजगी विनाअनुदानित
औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या प्रथम व थेट व्दितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २/एनजीसी/गुणवत्ता यादी पडताळणी/२०२५/DTEM-D२/१७१/२०२५-DESK२ दि. ४/११/२०२५.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील राज्य CET कक्षाच्या व संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या प्रथम व थेट व्दितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या गुणवत्ता याद्यास या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यात येणार आहे. पडताळणी करतांना सर्व साधारणपणे संदर्भीय पत्रात दिलेल्या व खालील कार्यपध्दती अवलंबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्याच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. प्रथम व थेट व्दितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्या सोबत जोडलेल्या आपल्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती येथे उपस्थित राहून तपासून घ्याव्यात व सदर गुणवत्ता याद्या या कार्यालयास **दिनांक ०८/१२/२०२५** पर्यंत या कार्यालयास सादर कराव्यात. यानंतर सादर केलेल्या गुणवत्ता याद्या कोणत्याही परीस्थितीत स्विकारल्या जाणार नाही, याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी. प्रवेश

मंजुरीच्या प्रस्तावासोबत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश प्रक्रिया शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहील. प्रवेश प्रक्रिया शुल्काचा भरणा करणेबाबत प्राधिकरणाकडून स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता आपल्या संस्थेतील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची तपासणी नमुद दिनांकास करण्यात यावी.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश शुल्क व विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतुदी तसेच वेळोवेळी पारीत झालेले प्रवेश नियम/शासन निर्णय/अधिसुचना/न्यायालयीन आदेश व विहीत केलेल्या नियमांनुसार प्रवेश पडताळणी अहवाल संचालनालयामार्फत सादर झाल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्रदान होणार नाही व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार सबंधित संस्था राहील याची नोंद घ्यावी. सोबत जोडलेल्या यादीमध्ये एखाद्या संस्थेचे नाव नजरचुकीने राहुन गेलेले असल्यास अश्या संस्थेनी या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**१)** प्रवेश यादी पडताळणीसाठी संस्थेच्या log in मध्ये राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने उपलब्ध करुन दिलेल्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादीची Latest प्रिंट आऊट घेऊन ती पडताळणीसाठी सादर करावी.

**२)** प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करतांना सक्षम प्राधिकरणाची फॉर्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, शासन निर्णय, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे अंतिम मान्यतेचे पत्र सबंधित विद्यापिठाचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे सलग्नता प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्राची प्रत जोडण्यात यावी. तसेच विद्यमान संस्थेने प्रथम व थेट व्दितीय वर्षाकरीता आवश्यक असलेली अनामत ठेव रक्कम (F.D.) सादर करणे आवश्यक आहे.

**३)** संस्थेस नवीन संस्था/नवीन अभ्यासक्रम किंवा प्रवेश क्षमता बदलास मान्यता दिलेल्या शासन निर्णयाची प्रत आणि तद्नंतर संचालनालयाच्या अंतिम मान्यतेची प्रत इत्यादी कागदपत्रे जोडण्यात यावी.

**४)** नवीन संस्थांनी आवश्यक रकमेची नियत ठेव (FD) भरणा केली असल्याची प्रत जोडावी. भरलेली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करण्यात येईल. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया यांचेकडून प्रवेश

क्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आलेली आहे अशा संस्थांनी नोंदणी शुल्क घेण्यात आले किंवा नाही याची पडताळणी करण्याकरीता नोंदणी शुल्क भरल्याची प्रत जोडावी.

**५)** संस्थास्तरावरील आणि केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील (ACAP) प्रवेशाकरिता संबंधित संस्थेने संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली जाहिरात, अर्ज मागविण्यासाठी कालावधी, प्राप्त अर्जांची गुणवत्ता यादी, प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार प्रवेश केले आहेत याबाबत आवश्यक कागदपत्रे सादर करावी.

**६)** अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच संस्था स्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी / संस्थाप्रमुखांनी आवश्यक ते पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणी वेळी सादर करावी.

**७)** सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश याद्या पडताळणी करतांना प्रवेशित उमेदवारांची संबंधीत अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक अर्हतेची विशेषत्वाने पडताळणी करणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने दिनांक ८/१०/२०२० असाधारण राजपत्र क्रमांक २३५, दिनांक २०/८/२०२१ असाधारण राजपत्र क्रमांक २३९ व दिनांक ३/८/२०२२ असाधारण राजपत्र क्रमांक २७३ अन्वये प्रसिध्द केलेली अर्हता तसेच पदवी आाणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेली अर्हता केवळ ग्राहय धरता येईल.

**८)** शुल्क परताव्याबाबत आणि मूळ कागदपत्रे परताव्याबाबत संबंधित संस्थेबदल काही तक्रार असल्यास त्याबाबत चौकशी करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा तसेच शुल्क परतावा व मुळ कागदपत्रे परताव्याबाबत संस्थेकडे कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह सादर करावे.

**९)** अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याचा वैध कालावधीचे कागदपत्राचे सादर करावे.

**१०)** महाराष्ट्र विना-अनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ दिनांक १७/८/२०१५ अस्तित्वात आला असून त्यामध्ये उशिरा प्रवेश / प्रवेशित उमेदवारांची माहिती उशिरा अपलोड करणे, मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमित करण्याची तरतूद नाही, ही बाब विचारात घेता

विहीत मुदतीनंतर केलेले किंवा राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर उशिरा अपलोड केलेले प्रवेश आणि मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त केलेले प्रवेश कोणत्याही सबबीवर मान्य करण्यात येणार नाही.

**११)** प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश यादी विहीत दिनांकापर्यंत सादर करणे बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

**१२)** मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी पावती सादर करुन प्रवेश देण्यात आलेले होते. सदर प्रकरणी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक तपासणी अधिकारी यांचे निदर्शनास आणावे.

**१३)** प्रथम व थेट व्दितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे अभ्यासक्रमाचे या कार्यालयाव्दारे केंद्रीभूत प्रवेशासाठी (CAP) अद्ययावत केलेल्या माहीतीची प्रत सादर करावी व त्याप्रमाणे Cap, Against Cap व Institue level करीता प्रवेशक्षमता ग्राहय धरावी. त्यामुळे गुणवत्ता यादी तपासणीसाठी सादर करतांना या कार्यालयाव्दारे मंजुर केलेली प्रत गुणवत्ता यादीसोबत सादर करावी.

**१४)** एखाद्या विशिष्ट प्रकरणी मा. सर्वोच्च वा मा. उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार सदर प्रकरणीचे कागदपत्रे निदर्शनास आणावे.

**१५)** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे AISHE चे प्रमाणपत्र सादर करावे.

**१६)** एनएसपी पोर्टलवर प्राचार्य व इन्स्टिटयुट नोडल ऑफीसर यांचे KYC केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

१७) प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे शुल्क भरल्याची पावती जोडावी.

**सोबत :- वेळापत्रकाची प्रत व संदर्भिय पत्राची प्रत.**

**(मनोज म अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर

## गुणवत्ता याद्या तपासणी स्थळ :- शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्यांची तपासणी करावयाच्या संस्थांची यादी व वेळापत्रक

| Sr No | Name of Institute | Course to be check | checking date |
|---|---|---|---|
| 1 | 01135 - Shri Gurudatta Shikshan Prasarak Sanstha's Institute of Pharmacy, Kaulkhad, Akola | B.Pharm/ M.Pharm | 28/11/2025 |
| 2 | 01304 - Mahatma Phule Pharmacy College, Babhulgaon Dist. Akola | B.Pharm | 28/11/2025 |
| 3 | 01311 - Late Shri. S. B Purushottam College of Pharmacy, Patur, Dist-Akola | B.Pharm | 28/11/2025 |
| 4 | 01003 - Government College of Pharmacy, Amravati | B.Pharm/ M.Pharm / Pharm D | 28/11/2025 |
| 5 | 01131 - Vidya Bharati College of Pharmacy, Amravati | B.Pharm/ M.Pharm | 28/11/2025 |
| 6 | 01164 - Shree, Swami Samarth Institute of Pharmacy, at parsodi, Dhamangaon Rly, Dist.Amravati | B.Pharm | 28/11/2025 |
| 7 | 01283 - P R Pote Patil College of Pharmacy, Amravati | B.Pharm/ M.Pharm | 28/11/2025 |
| 8 | 01284 - Dr. Rajendra Gode Institute of Pharmacy, Amravati | B.Pharm/ M.Pharm | 29/11/2025 |
| 9 | 01286 - Institute of Pharmacy & Research, Badnera | B.Pharm/ M.Pharm | 29/11/2025 |
| 10 | 01296 - Dr. Rajendra Gode College Of Pharmacy, Amravati | B.Pharm/ M.Pharm | 29/11/2025 |
| 11 | 01297 - Vidyaniketan College Of Pharmacy, Anjangaon Surji | B.Pharm | 29/11/2025 |
| 12 | 01133 - Anuradha College Of Pharmacy, Chikhli | B.Pharm/ M.Pharm | 29/11/2025 |
| 13 | 01136 - Dr. Rajendra Gode College of Pharmacy,Malkapur | B.Pharm/ M.Pharm | 29/11/2025 |
| 14 | 01158 - Paramhansa Ramkrishna Maunibaba Shikshan Santha's Anuradha College of Pharmacy, Chikhali | B.Pharm/ M.Pharm | 29/11/2025 |
| 15 | 01161 - Matoshri Education Society's Satyajeet College of Pharmacy, Khandala, Akola Road Mehkar, Tq. Mehkar, Dist. Buldhana | B.Pharm | 1/12/2025 |
| 16 | 01271 - Rajarshi Shahu College of Pharmacy, Buldhana | B.Pharm/ M.Pharm | 1/12/2025 |
| 17 | 01280 - Gawande College of Pharmacy, Sakharkherda | B.Pharm/ M.Pharm | 1/12/2025 |
| 18 | 01282 - Laddhad College of Pharmacy, Yelgaon, Buldhana | B.Pharm/ M.Pharm | 1/12/2025 |
| 19 | 01285 - MES College of Pharmacy, Mehkar | B.Pharm | 1/12/2025 |
| 20 | 01291 - Shri. Sant Gajanan Maharaj College Of Pharmacy, Buldhana | B.Pharm/ M.Pharm | 1/12/2025 |
| 21 | 01292 - Dr.R.N.Lahoti Institute Of Pharmaceutical Education And Research Center, Sultanpur | B.Pharm/ M.Pharm | 1/12/2025 |

| Sr No | Name of Institute | Course to be check | checking date |
|---|---|---|---|
| 22 | 01294 - Samarth College Of Pharmacy, Deulgaon Raja | B.Pharm/ M.Pharm | 2/12/2025 |
| 23 | 01295 - Karmayogi Tatyasaheb Bondre Institute Of Pharmacy, Chikhli | B.Pharm/ M.Pharm | 2/12/2025 |
| 24 | 01299 - NK College of Pharmacy, Antraj Khamgaon | B.Pharm | 2/12/2025 |
| 25 | 01303 - Satpuda Institute of Pharmacy, Shegaon | B.Pharm | 2/12/2025 |
| 26 | 01305 - Cambridge College of Pharmacy, Yelgaon Dist. Buldhana | B.Pharm | 2/12/2025 |
| 27 | 01306 - Rajashri College of Pharmacy | B.Pharm | 2/12/2025 |
| 28 | 01345 - Late. Sushilabai Jaiswal College of Pharmacy, Ramgaon | B.Pharm/ M.Pharm | 2/12/2025 |
| 29 | 01264 - Vidarbha Institute of Pharmacy, Washim | B.Pharm | 3/12/2025 |
| 30 | 01270 - MUP's College of Pharmacy (B. Pharm), Degaon Tq. Risod Dist. Washim | B.Pharm | 3/12/2025 |
| 31 | 01281 - Takshashila Institute of Pharmaceutical Education And Research | B.Pharm/ M.Pharm | 3/12/2025 |
| 32 | 01288 - Vardhaman College of Pharmacy, Karanja (LAD), Washim | B.Pharm | 3/12/2025 |
| 33 | 01293 - Shraddha Institute Of Pharmacy, Washim | B.Pharm/ M.Pharm | 3/12/2025 |
| 34 | 01301 - Mauli Institute of Pharmacy & Research Centre, Washim | B.Pharm | 3/12/2025 |
| 35 | 01115 - J.S.P Mandal's Sudhakarrao Naik Institute of Pharmacy, Pusad Dist. Yavatmal | B.Pharm/ M.Pharm | 4/12/2025 |
| 36 | 01134 - Yavatmal Zilla Vikas Samitee's Pataldhamal Wadhwani College of Pharmacy, Yavatmal | B.Pharm/ M.Pharm | 4/12/2025 |
| 37 | 01157 - Shri Chhatrapati Shahumaharaj Shikshan Santha's Institute Of Pharmacy, Maregaon | B.Pharm | 4/12/2025 |
| 38 | 01159 - Navsanjivan Shikshan Mandal's College of Pharmacy, Dharwa | B.Pharm | 4/12/2025 |
| 39 | 01160 - Shri.Durgamata Bahuudeshiya Krida and Shaikshanik Sanstha,Ishwar Deshmukh Institute Of Pharmacy, Digras | B.Pharm/ M.Pharm | 4/12/2025 |
| 40 | 01171 - Pataldhamal Wadhwani College of Pharmacy, Yavatmal | B.Pharm/ M.Pharm | 4/12/2025 |
| 41 | 01290 - Jagadambha Institute Of Pharmacy And Research, Kalamb | B.Pharm | 4/12/2025 |
| 42 | 01307 - Sushganga College of Pharmacy Wani | B.Pharm | 5/12/2025 |
| 43 | 01343 - Savitridevi College of Pharmacy Wani | B.Pharm | 5/12/2025 |

**i/c Joint Director**
Technical Education
Amravati

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ गुणवत्ता यादीतील त्रुटया दर्शविणारे विवरणपत्र

संस्थेचे नांव:-

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव (प्रथम वर्ष / व्दितीय वर्ष / व शाखा स्पष्ट नमुद करावी) | CAP /ACAP /IL असे नमुद करावे. | यादीतील अ.क्र. | त्रुटी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

तपासणी अधिका-याची स्वाक्षरी

**Admissions to Professional Technical Courses for the Academic Year 2025-26**

**CERTIFICATE**

This is certify that this Directorate has verified the admissions of students admitted at **[DTE CODE** ________ **& NAME**____________]for **Under Graduate / Post Graduate Program B.E / M.E. of** ___**First / Direct Second**_________Course for the Academic Year 2025-26, the detailed report is given below -

*A. (1) Admissions within Sanctioned Intake*

| Sr No | Choice Code, Branch Name and Shift, if any | Intake | No. of students admitted | No. of admissions recommended for approval | No. of admissions found certain discrepancy* | No. of admissions found not Eligible # | No. of student cancelled / Not Joined the course, if any | Total (5 + 6 + 7 + 8 ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | **Total** | | | | | | | |

**# No. of admissions found not Eligible for the course as per the eligibility criteria/ rules/ regulation laid down by the respective apex bodies, if any**

(2) *Discrepancies marked in Admissions within Sanctioned Intake:

| Sr No | Sr No in the Admitted Candidates List | Choice Code, Branch Name and Shift, if any | Application ID | Name of the Candidate | Nature of Discrepancy |
|---|---|---|---|---|---|
| (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) | (vi) |
| **1** | | | | | |

*B. (1) Admissions under Tuition Fee Waiver Scheme*

| **Sr No** | **Choice Code, Branch Name and Shift, if any** | **Intake** | **No. of students admitted** | **No. of admissions recommended for approval** | **No. of admissions found certain discrepancy*** | **No. of admissions found not Eligible #** | **No. of student cancelled / Not Joined the course, if any** | **Total (5 + 6 + 7 + 8 )** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) |
| | | | | | | | | |
| **Total** | | | | | | | | |

**# No. of admissions found not Eligible for the course as per the eligibility criteria/ rules/ regulation laid down by the respective apex bodies, if any**

(2) *Discrepancies marked in Admissions under Tuition Fee Waiver Scheme:

| **Sr No** | **Sr No in the Admitted Candidates List** | **Choice Code, Branch Name and Shift, if any** | **Application ID** | **Name of the Candidate** | **Nature of Discrepancy** |
|---|---|---|---|---|---|
| (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) | (vi) |
| **1** | | | | | |

*C. (1) Admissions under Economically Weaker Section Seats*

| Sr No | Choice Code, Branch Name and Shift, if any | Intake | No. of students admitted | No. of admissions recommended for approval | No. of admissions found certain discrepancy* | No. of admissions found not Eligible # | No. of student cancelled / Not Joined the course, if any | Total (5 + 6 + 7 + 8 ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) |
| | | | | | | | | |
| **Total** | | | | | | | | |

**# No. of admissions found not Eligible for the course as per the eligibility criteria/ rules/ regulation laid down by the respective apex bodies, if any**

(2) *Discrepancies marked Admissions under Economically Weaker Section Seats:

| Sr No | Sr No in the Admitted Candidates List | Choice Code, Branch Name and Shift, if any | Application ID | Name of the Candidate | Nature of Discrepancy |
|---|---|---|---|---|---|
| (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) | (vi) |
| | | | | | |

*D. (1) Admissions under Foreign Nationals/OCI / CIWGC/NEUT/ PMSSS / JKMigrant / Any Other*

| Sr No | Choice Code, Branch Name and Shift, if any | Intake $ | No. of students admitted | No. of admissions recommended for approval | No. of admissions found certain discrepancy* | No. of admissions found not Eligible # | No. of student cancelled / Not Joined the course, if any | Total (5 + 6 + 7 + 8 ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) |
| | | | | | | | | |
| **Total** | | | | | | | | |

**$ Intake means seats approved for F*oreign Nationals / OCI / CIWGC plus the number candidates admitted by the institute for the supernumerary seats such as NEUT/ PMSSS/JKMigrant/Any Other.***

**# No. of admissions found not Eligible for the course as per the eligibility criteria/ rules/ regulation laid down by the respective apex bodies, if any**

(2) *Discrepancies marked in Admissions under Foreign Nationals / OCI / CIWGC/ NEUT/ PMSSS / JKMigrant / Any Other:

| Sr No | Sr No in the Admitted Candidates List | Choice Code, Branch Name and Shift, if any | Application ID | Name of the Candidate | Nature of Discrepancy |
|---|---|---|---|---|---|
| (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) | (vi) |
| 1 | | | | | |

General remarks, if any,-

The number of admissions shown in column No. 5 are scrutinized / verified and fulfil the eligibility criteria as per rules / regulations laid down by the respective authorities, hence recommended for approval of the Hon'ble Admissions Regulating Authority, M.S.

The discrepancies pointed out by this Directorate (in above tables at column No. 6) is communicated to the concerned College/Institute as well as Authority and directed to comply with the said discrepancies to the Authority office on or before the <**Date**>without fail.

Date: __ / ___ / **2025** **RO Seal** **Verified by**

**Place: Amravati**

**(Manoj M. Andhare)**
**Joint Director**
**Regional Office, Amravati**

महाराष्ट्र शासन

**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website:** www.jdroamt.org

**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No:** (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२५/

दिनांक :-

## :- प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/ गु यादी/ २०२५/------------, दि.----------- तसेच प्राचार्य, ______________ ________________, __________________ यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक ______________________________ नुसार (संस्थेचे नांव)______________________________ या संस्थेच्या अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरीता महाराष्ट्र शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रिया (CAP) / संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेऊन संस्थेकडे अर्ज व अर्जासोबत जोडलेली विद्यार्थ्याची प्रमाणपत्रे सादर केली आहेत, त्या सर्व अर्ज व प्रमाणपत्रांची शासनाचे नियम व प्रवेश नियमावलीनुसार तपासणी करुन गुणवत्ता यादी तपासली आहे. ज्या उमेदवारांच्या बाबतीत त्रूटी आढळल्या त्यांचे बाबतीत स्वतंत्र त्रुटी पत्रावर नमूद केल्या आहेत. तसेच प्रवेश यादीत असलेल्या प्रत्येक उमेदवाराचे नांव गुणवत्ता यादीत असल्याची खात्री करुन घेतली आहे.

तपासणी अधिकारी स्वाक्षरी

नांव:-

पदनाम :

संस्था :

महाराष्ट्र शासन
**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Website**: www.jdroamt.org
**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in
**Fax No**: (0721) 2577913

**अत्यंत महत्वाचे**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२५/
दिनांक :-

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती
## प्रपत्र -

| संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | भरलेल्या जागा | रिक्त जागा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | मुले |
| | | | | | मुली |

प्राचार्यांची स्वाक्षरी

शिक्का

तपासणी अधिकारी स्वाक्षरी
नांव:-
पदनाम :
संस्था :

## शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्यांसोबत सादर करावयाची व तपासणी अधिकाऱ्यांनी तपासावयाची कागदपत्रे.

| अ.क्र | आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे | साक्षांकित छायांकित प्रत उपलब्ध आहे / नाही. | तपासणी अधिका-यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली,, शासन मान्यता, विद्यापिठाचे सलग्नीकरण यांचे मान्यता पत्र आहे किंवा नाही. | | |
| २ | संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे मान्यता पत्र आहे किंवा नाही, ते स्पष्टपणे नमुद करावे. | | |
| ३ | संस्थांनी नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्ती, यंत्रसामुग्री व अद्यायावत प्रयोगशाळा, ग्रथालय सुविधा विद्यार्थ्यांना देत असल्याबाबत हमिपत्र सादर केले किंवा नाही. | | |
| ४ | संस्था स्तरावर प्रवेश फेरीकरीता वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याची प्रत जोडली किंवा नाही. | | |
| ५ | सांखिकी माहिती विहीत प्रपत्रात आहे किंवा नाही. | | |
| ६ | संस्थेत प्राचार्याचे नियमीत पद भरले आहेत किंवा नाही, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीबाबत तसेच इतर बाबतीत तक्रारी नाहीत याबाबत स्पष्टीकरण. | | |
| ७ | शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्यात येते किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र | | |
| ८ | रॅगिंग प्रतिबंधक समिती तसेच रंगींग प्रतिबंधकबाबत संस्थेतर्फे वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे काय.. | | |
| ९ | मागासवर्गीय उमेदवाराकडून शासन निर्णयाप्रमाणे/संचालनालयाच्या आदेशाप्रमाणे शुल्क आकारण्याबाबतची कार्यवाही केली किंवा कसे? | | |
| ११ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थानी वर्षाकरीता मुदतठेवीचा दुसरा हप्ता तसेच इतर मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई व संस्था अध्यक्ष यांचे संयुक्त ठेव खात्यात जमा केले किंवा नाही . | | |

प्राचार्यांची स्वाक्षरी
नांव:-
शिक्का

तपासणी अधिकारी स्वाक्षरी
नांव:-
पदनाम :
संस्था :

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597475, 465, 492, 442, 443, 447
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/गुणवत्ता यादी पडताळणी/२०२५/DTEM-D2/171/2025-DESK 2

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छ.संभाजीनगर, अमरावती, नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया....

संदर्भ : मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण/२२२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/१३८३, दि.३०.१०.२०२४

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया संपन्न होत आलेली आहे. प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत करण्यात आलेल्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक असते. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने संदर्भीय पत्रान्वये प्रवेश नियामक प्राधिकरणातर्फे खालीलप्रमाणे प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

२. अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतुदींच्या अनुषंगाने, व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया, वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी ऑनलाईन संगणक प्रणालीव्दारे करण्यात येत आहे. तथापि, मागील वर्षाप्रमाणेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश संगणक प्रणालीचा वापर करून ऑनलाईन पध्दतीने प्रवेश पडताळणी पुर्ण करावयाची आहे.

३. प्राधिकरणाकडील ऑनलाईन प्रवेश पडताळणी प्रक्रियेनुसार संचालनायांतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबतची आवश्यक कागदपत्रे व माहिती तपासुन त्याचा अहवाल संचालकांनी त्यांच्या लॉगीनव्दारे ऑनलाईन पोर्टलमध्ये अद्ययावत करावा. संचालनालयामार्फत ऑनलाईन अद्ययावत केलेला तपासणी अहवाल संबंधित महाविद्यालयास त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध होईल. संबंधित महाविद्यालये असा लॉगीनमध्ये प्राप्त प्रमाणित केलेला तपासणी अहवाल प्रवेश नियामक प्राधिकरणांस "प्रवेश मान्यता प्रस्ताव" या स्वरूपात मान्यतेसाठी संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने सादर करतील.

४. नमूद तरतुदीनुसार व अधिनियम २०१५ च्या कलम १६(३) मधील तरतूदींनुसार प्राधिकरणाच्या संगणक प्रणालीव्दारे, प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश प्रक्रिया शुल्काचा भरणा केल्याशिवाय तसेच, परिच्छेद ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या संगणक प्रणालीव्दारे प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राप्त झाल्याशिवाय

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्रदान करण्यात येणार नाही व त्यास सर्वस्वी संबंधित महाविद्यालय/ संस्था जबाबदार राहील.

उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता आपल्या अधिनस्त सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची ऑनलाईन पध्दतीने तपासणी करण्याकरिता संचालनालयाच्यावतीने आपणास प्राधिकृत करण्यात येत आहे. आपल्या कार्यालयाने ऑनलाईन पध्दतीने पडताळणी केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादया शिफारशीसह अंतिम मान्यतेकरिता प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करण्यासाठी या संचालनालयास ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात याव्यात. आपल्या शिफारशीप्रमाणे या संचालनालयातर्फे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादया मान्यतेस्तव प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करण्यात येतील. त्यामुळे प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या यादीस शिफारस करतांना काही त्रुटी अथवा चुका आढळल्यास त्याची सर्व जबाबदारी ही आपली राहील, याची नोंद घ्यावी.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५ मधील तरतुदी तसेच वेळोवेळी पारित झालेले प्रवेश नियम/ शासन निर्णय/ अधिसुचना/ न्यायालयीन आदेश व विहीत केलेल्या नियमांनुसार प्रवेश पडताळणी अहवाल संचालनालयामार्फत सादर झाल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्रदान होणार नाही व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार राहील. ही बाब आपल्या विभागातील सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणावी.

प्रवेश यादी पडताळणी करताना खालील बाबींची पडताळणी करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

१. प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करण्यात आलेल्या संस्थेस संबंधित सक्षम प्राधिकरणाची (AICTE/PCI/COA) परवानगी असल्याचे कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावीत.
२. संस्थेस नवीन संस्था / नवीन अभ्यासक्रम किंवा प्रवेश क्षमता बदलास मान्यता दिलेल्या शासन निर्णयाची प्रत आणि तदनंतर संचालनालयाच्या अंतिम मान्यतेची प्रत या कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावी.
३. नवीन संस्थांनी आवश्यक रकमेची नियत ठेव (FD) भरणा केली आहे किंवा नाही याची पडताळणी करावी , भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आलेली आहे, अशा आपल्या विभागातील संस्थांकडून नोंदणी शुल्क घेण्यात यावे. या अनुषंगिक बाबींची कार्यवाही करण्याची जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.
४. संस्था स्तरावरील आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील (ACAP) प्रवेशाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार प्रवेश केले आहेत, इत्यादी बाबींची काळजीपूर्वक पडताळणी करण्यात यावी.
५. अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी / संस्थाप्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणी वेळी तपासावे.
६. सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश यादया पडताळणी करतांना प्रवेशित उमेदवारांची संबंधित अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक अर्हतेची व प्रकरण परत्वे इतर सर्व कागदपत्रांची विशेषत्वाने पडताळणी

करणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रसिध्द केलेल्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केल्यानुसार अर्हता ग्राहय धरता येईल.

७. संस्थेकडून प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर झाल्यानंतर शुल्क परताव्याबाबत आणि मूळ कागदपत्रे परताव्याबाबत संबंधित संस्थेबद्दल काही तक्रार असल्यास त्याबाबत चौकशी करुन अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा. मात्र प्रवेश यादी प्रमाणित करण्याची कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात येवू नये. तसेच शुल्क परतावा व मूळ कागदपत्रे परताव्याबाबत संस्थेकडे कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र सर्व संबंधित संस्थेच्या प्राचार्यांकडून घेण्यात यावे.

८. अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याचा वैध कालावधीची पडताळणी करण्यात यावी.

९. मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी पावती सादर करून प्रवेश देण्यात आलेले होते. सदर प्रकरणी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेऊन अशा प्रकरणी पडताळणी करावी.

१०. एखादया विशिष्ट प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार ते प्रकरण तपासावे.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करून प्रवेश यादी पडताळणीची प्रक्रिया दि.२०.१२.२०२५ रोजी पर्यंत पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल ऑनलाईन पध्दतीने राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्याकडे सादर करण्याकरीता, संचालनालयास दि.२२.१२.२०२५ रोजी पर्यंत सादर करण्यात यावा.

प्रवेश यादी मंजूर झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाहय प्रवेश अथवा अनियमितता झाल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल, याची व्यक्तीश: नोंद घ्यावी.

Signed by
Vinod Mahadeorao Mohitkar
Date: 04-11-2025 18:14:26

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १)मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव.
२)कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
